दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com    संपादक : अजय भांगे    https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १५७ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sunday 1 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 157 • Pages 4 • Rate 4 Rs

# निर्भीड लेखणीचा आवाज अजय भांगे आणि दैनिक वादळ वार्ता

## सामान्यांच्या न्यायासाठी लढणाऱ्या दैनिक वादळ वार्ताचे यशस्वी चौथे वर्ष



पत्रकारिता ही केवळ बातम्या प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया नसून ती समाजाचा आरसा, अन्यायाविरोधातील शस्त्र आणि सामान्य माणसाच्या आशेचा आधार असते. या मूल्यांशी प्रामाणिक राहून गेल्या चार वर्षांपासून सातत्याने निर्भीड पत्रकारिता करणारे दैनिक वादळ वार्ता आज आपल्या यशस्वी चौथ्या वर्षात पदार्पण करत आहे. या यशस्वी वाटचालीमागे संपादक अजय भांगे यांची स्पष्ट भूमिका, परखड लेखणी आणि समाजाभिमुख दृष्टी ठामपणे उभी आहे. अजय भांगे यांनी पत्रकारितेचा स्वीकार हा केवळ व्यवसाय म्हणून न करता समाजसेवेचे माध्यम म्हणून केला. सामान्य माणसाला न्याय मिळालाच पाहिजे हा विचार केंद्रस्थानी ठेवून त्यांनी दैनिक वादळ वार्ताची स्थापना केली. शेतकरी प्रश्न, ग्रामीण भागातील दुर्लक्षित समस्या, महिला अत्याचार, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, प्रशासनातील भ्रष्टाचार अशा असंख्य विषयांवर वादळ वार्ताने निर्भीडपणे आवाज उठवला आहे.चार वर्षांच्या या कालखंडात दैनिक वादळ वार्ताने अनेक सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी भूमिका बजावली. प्रशासनाचे लक्ष वेधून घेणाऱ्या बातम्या, चौकशीस भाग पाडणारे  वृत्तांकनआणि जनमत घडवणारे लेख यामुळे वादळ वार्ता आज विश्वासार्ह माध्यम म्हणून ओळखले जाते. बातमीच्या पलीकडे जाऊन माणसाचा विचार करणारी पत्रकारिता हेच या दैनिकाचे खरे बलस्थान ठरले आहे. आज दैनिक वादळ वार्ता संपूर्ण महाराष्ट्रात प्रकाशित होत असून राज्याच्या कानाकोपऱ्यातील वास्तव या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचत आहे. ग्रामीण भागातील प्रतिनिधी असोत किंवा शहरी विभागातील पत्रकार - अनेक प्रतिनिधींच्या सक्रिय सहभागामुळे हे वृत्तपत्र अधिक व्यापक, सशक्त आणि लोकाभिमुख झाले आहे. प्रत्येक प्रतिनिधीला समान संधी, विश्वास आणि स्वातंत्र्य देत संघभावना जपणे हे संपादक अजय भांगे यांचे नेतृत्वगुण ठळकपणे दिसून येतात. वादळ वार्ताची पत्रकारिता ही सत्तेच्या बाजूने नव्हे, तर सत्याच्या बाजूने उभी राहणारी आहे. दबाव, प्रलोभन किंवा भीती यांना न जुमानता सत्य मांडण्याची भूमिका या दैनिकाने कायम जपली आहे. त्यामुळेच अल्पावधीतच वादळ वार्ताने वाचकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. समाजातील वंचित, दुर्बल आणि दुर्लक्षित घटकांसाठी हे वृत्तपत्र आज आशेचे व्यासपीठ बनले आहे. यशस्वी चौथ्या वर्षात पदार्पण करत असताना दैनिक वादळ वार्ता ही केवळ बातम्यांचे माध्यम न राहता एक सामाजिक चळवळ बनत असल्याचे चित्र दिसून येते. सत्य, निर्भीडपणा, सामाजिक बांधिलकी आणि लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारी ही पत्रकारिता पुढील काळात अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा आहे. या गौरवपूर्ण क्षणी संपादक अजय भांगे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य अधिक जोमाने करण्याची ऊर्जा लाभो, हीच सदिच्छा. सामान्यांचा आवाज बुलंद करणारे हे वादळ असेच महाराष्ट्रभर घोंघावत राहो, हीच अपेक्षा.



प्रो.विष्णु सरवदे
हैद्राबाद विश्वविद्यालय







# सुनेत्रा पवार राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्रीपदी विराजमान

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथील दुर्दैवी विमान अपघातातील निधनानंतर, महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल झाले आहेत. या धक्कादायक घटनेतून सावरत राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) पक्षाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अजित दादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली असून, आज त्यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. राज्यावर ओढवलेल्या या दुःखद प्रसंगामुळे कोणताही गाजावाजा न करता, मोजक्याच नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने हा शपथविधी सोहळा पार पडला. अजित दादांच्या जाण्याने निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी आणि पक्षाची विखुरलेली मोट बांधण्यासाठी सुनेत्रा पवार यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आता राज्याच्या आणि पक्षाच्या नेतृत्वाची सर्व सूत्रे सुनेत्रा वहिनींच्या हाती असतील.१८ ऑक्टोबर १९६३ रोजी धाराशिव जिल्ह्यातील तेर येथे जन्मलेल्या सुनेत्रा पवार यांना माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या रूपाने राजकीय वारसा माहेरूनच मिळाला होता. १९८५ मध्ये अजित पवार यांच्याशी विवाहबद्ध झाल्यानंतर त्यांनी बारामतीतील काटेवाडीतून आपल्या सामाजिक कार्याचा श्रीगणेशा केला. सुनेत्रा पवार यांनी काटेवाडीमध्ये ग्रामस्वच्छता मोहिमेची मुहूर्तमेढ रोवली. पहाटे स्वतः हातात झाडू घेऊन त्यांनी सुरू केलेल्या या चळवळीने गावाला राज्यात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून दिले. त्यांच्या या कार्याची दखल जागतिक स्तरावर घेतली गेली, ज्यामुळे त्यांना 'सार्क' परिषदेत सहा देशांच्या राष्ट्रप्रमुखांसमोर भाषण करण्याचा बहुमान मिळाला. 'एनव्हायर्नमेंट फोरम ऑफ इंडिया'च्या माध्यमातून त्यांनी पर्यावरण रक्षणासह मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि महिलांमध्ये कर्करोग जागृती असे आरोग्यविषयक उपक्रम राबवले. तसेच 'बारामती टेक्सटाईल पार्क'च्या अध्यक्ष म्हणून त्यांनी हजारो महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. आज उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर, त्यांच्या या प्रदीर्घ सामाजिक अनुभवाचा राज्याला मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.सुनेत्रा पवार यांचा हा प्रवास सोपा नव्हता. लग्नानंतर त्यांनी केवळ राजकीय पत्नीची भूमिका न बजावता, प्रत्यक्षात जमिनीवर उतरून काम केले. शेतात काम करणे असो, पोल्ट्री व्यवसाय सांभाळणे असो किंवा गाई-गुरांचे दूध काढणे, ही सर्व कष्टकरी कामे त्यांनी आनंदाने केली. अजित दादांच्या प्रत्येक राजकीय चढ-उतारात त्या त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. घर आणि नातेसंबंध जपण्यासोबतच, कठीण प्रसंगी दादांना योग्य राजकीय सल्ला देण्यात सुनेत्रा वहिनींचा मोठा वाटा होता. आज उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन त्यांनी केवळ अजित दादांचा वारसाच पुढे नेला नाही, तर राज्यातील महिलांसाठी राजकारणाचे एक नवे शिखर सर करून दाखवले आहे.



# संपादकीय

## विदर्भात सत्ता स्थापनेचा खेळ

अकोल्यात भारतीय जनता पक्षाच्या शारदा खेडकर यांची महापौरपदी निवड झाली, तर नागपूरमध्ये भाजपची पकड मजबूत असताना अमरावतीत सत्ता निश्चित होत आहे, मात्र चंद्रपूरमध्ये राजकीय संघर्षाने चित्र अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे.महाराष्ट्रात महापालिका निवडणुकांचे निकाल लागून आता दोन आठवडे उलटलेले आहेत. विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या चारही महापालिकांमध्ये महायुतीची सत्ता येईल असे चित्र सुरुवातीला वाटत होते. त्यानुसार अकोल्यात भारतीय जनता पक्षाच्या शारदा खेडकर यांची महापौरपदी निवड झाली आहे, तर नागपूरमध्ये ६ फेब्रुवारीला भारतीय जनता पक्षाचाच महापौर निवडला जाईल हे नक्की आहे. मात्र अमरावती आणि चंद्रपूर येथे आजही परिस्थिती काहीशी अनिश्चित वाटत आहे. त्यातही अमरावतीत आता परिस्थिती आटोक्यात आली असल्यासारखे दिसते आहे मात्र चंद्रपुरात अजूनही मारामारी सुरूच आहे.

नागपूरमध्ये १५१ जागांपैकी भाजपने १०२ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे त्यांना कोणाच्याही मदतीची गरज नाही. ते स्वबळावरच सर्व पदांवर दावा सांगू शकतात. मात्र शिंदे सेनेला ते एखादी तरी जागा देतील अशी शक्यता बोलली जात आहे. त्याचप्रमाणे रिपब्लिकन आठवले गटाला सुद्धा ते सत्तेत सहभागी करतील हे देखील निश्चित आहे. कारण नागपुरात रिपब्लिकन मतांचा जो जोर असलेला भाग आहे, तिथे हा भाग भविष्यातही भाजपसोबतच यावा यासाठी ही रणनीती असेल असे बोलले जाते.याचवेळी नागपुरात भारतीय जनता पक्षाने कठोर आत्मपरीक्षण करण्याची देखील गरज राजकीय विश्लेषक बोलून दाखवत आहेत. २०१७ मध्ये नागपुरात भाजपला १०८ जागांवर विजय मिळाला होता. मात्र यावेळी ती संख्या १०२ वर घसरलेली आहे. नागपुरातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वच भाजप नेते निवडणुकीपूर्वी आम्ही १२० जागा जिंकू असा दावा करत होते. मात्र शून्याची जागा बदलली असल्यामुळे १२० चे १०२ झाले आहेत. हे बघता भाजपची रणनीती कुठेतरी चुकली असेही बोलले जाते आहे.भाजपच्या जागा कमी होण्यामागे विदर्भात नागपुरात एमआयएमचे जे काही प्रस्थ वाढले ते देखील लक्षात घेणे गरजेचे झाले आहे. काही दिवसांपूर्वी नागपूरच्या मुस्लीमबहुल भागात दंगल झाली आणि ती इकडे शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचली होती. त्यावेळी त्या काही घटना घडल्या त्याचेच पर्यावसान एमआयएमचे वर्चस्व वाढवण्यात झाले असल्याचे बोलले जात आहे. या दंगलीच्या प्रमुख सूत्रधार म्हणून त्याला अटक झाली होती त्याची पत्नीच एका प्रभागातून विजयी झाली आहे. त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षात जागा वाटपामध्ये जे काही गोंधळ झाले त्यामुळे देखील पक्षाला काही जागांचा फटका बसला हे निश्चित आहे. उमेदवार निवडताना काही ठिकाणी बाहेरच्या पक्षातून आलेल्या उमेदवारांना प्राधान्यक्रम देत जुन्या जाणत्यांना अंगठा दाखवला गेला. त्याचप्रमाणे बाहेरच्या प्रभागातील उमेदवारांना भलत्याच प्रभागात लादले गेले. अखेरच्या क्षणापर्यंत याद्या जाहीर केल्या नाहीत आणि उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवारांना बोलावून बी फॉर्म दिले गेले. त्यामुळे जो काही गोंधळ झाला त्याचा परिणाम मतदारांवर देखील झाला आहे.त्याचबरोबर काँग्रेसमध्ये नवे शहराध्यक्ष विकास ठाकरे यांनी जो नियोजनबद्ध प्रचार केला आणि योग्य असे उमेदवार निवडले त्याचाही फटका भाजपला बसल्याचे बोलले जात आहे. विकास ठाकरे हे धडाकेबाज नेते म्हणून ओळखले जातात त्याचाच फायदा काँग्रेसला झाल्याचे बोलले जात आहे.अमरावतीत जरी भाजपला स्पष्ट बहुमत मिळालेले नसले तरी राणांच्या युवा स्वाभिमान पक्षाने त्यांना निर्विवाद पाठिंबा दिला आहे. त्यामुळे भाजप राणांचा पक्ष आणि काही अपक्ष म्हणून अमरावतीत भाजपची सत्ता येईल हे आता निश्चित झाले आहे. ६ फेब्रुवारीला अमरावतीत महापौर, उपमहापौरांची निवडणूक होणार आहे त्या दिवशी चित्र स्पष्ट होईल.चंद्रपूरमध्ये मात्र आज काय होईल हे सांगणे कठीण आहे. तिथे भाजपमध्ये आमदार किशोर जोरगेवार आणि आमदार सुधीर मुनगंटीवार या दोघांच्या भांडणामुळे आणि शहराध्यक्षांनी ऐनवेळी उमेदवार यादी बदलल्यामुळे भाजपला जागा कमी मिळाल्या आणि काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. शिवसेना उबाठा गटाच्या मदतीने काँग्रेस तिथे सत्ता मिळवू शकेल असे चित्र होते. मात्र मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना उबाठा पक्षाने तिथे अवघ्या सहा जागांच्या जोरावर पहिली अडीच वर्षे महापौरपद मागितले आहे, तर २७ जागा घेणाऱ्या काँग्रेसमध्ये शिवसेनेला महापौर पद देऊ नये असा मतप्रवाह आहे. त्यामुळे परिस्थिती डामाडौल आहे.त्याचवेळी काँग्रेसमध्ये खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार विजय वडेट्टीवार यांच्यातला संघर्ष उफाळून आला आहे. दोघांनीही नगरसेवकांचे वेगवेगळे गट तयार केले असून एका गटाने सर्व सदस्यांची नोंदणी करून टाकली आहे. त्यामुळे जास्तच गोंधळाची परिस्थिती झाली आहे. त्यात वडेट्टीवार गटाचे नगरसेवक बसने जात असताना त्यांच्यावर हल्ला केल्याची घटना घडली आणि ही घटना धानोरकर गटाने घडवून आणल्याचा दावा केला जात आहे. त्यातील एक हल्लेखोर पकडला गेला असून त्याच्याकडून ही माहिती मिळाल्याचे सांगितले जात आहे.


इथे काँग्रेसवासी असलेले विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर हे दोघेही मूळ शिवसैनिकच आहेत. विजय वडेट्टीवार २००५-६ या दरम्यान नेते नारायण राणे यांच्या समवेत शिवसेनेतून काँग्रेसमध्ये आले. काँग्रेसमध्येच वाढत वाढत ते आता विरोधी पक्षनेते पदापर्यंत पोहोचण्याच्या तयारीत आहेत. प्रतिभा धानोरकर यांचे पती बाळू धानोरकर हे २०१९ पर्यंत शिवसैनिकच होते. त्यावेळी ते शिवसेनेचे आमदार होते आणि त्यांना लोकसभेची उमेदवारी हवी होती.मात्र ही जागा युतीमध्ये भाजपसाठी सोडलेली असल्यामुळे त्यांनी शिवसेना पक्ष सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि काँग्रेसची उमेदवारी घेऊन भाजपचे उमेदवार आणि तत्कालीन केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहिर यांना पराभव करत ते खासदार म्हणून निवडून आले. नंतर बाळू धानोरकर यांचे निधन झाल्यावर प्रतिभा धानोरकर यांना पक्षाने उमेदवारी दिली आणि त्या विद्यमान खासदार आहेत. मात्र वडेट्टीवार आणि धानोरकर या दोघांमध्ये विस्तवही जात नाही. त्यामुळे आता महापौर कोणत्या गटाचा करायचा यावर वाद सुरू असल्याची माहिती आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दोन्ही गटांना एकत्र बसवून तडजोड करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यातून काहीही साध्य झाले नाही. परिणामी दोघांमध्ये चांगलेच भांडण सुरू आहे. याच दरम्यान भारतीय जनता पक्षाचे जिल्ह्यातील नेते सुधीर मुनगंटीवार हे मात्र महापौर आमचाच होणार असा दावा करीत आहेत. त्यांना या दोन दिग्गजांच्या भांडणाचा कितपत फायदा मिळेल त्यावरच चंद्रपूरचा महापौर कोणाचा होणार हे भविष्य ठरणार आहे.

# बहुजनांच्या न्यायासाठी उभा ठाकलेला आक्रमक योद्धा-आदरणीय प्रा.मनोहर धोंडे सर

**दैनिक वादळ वार्ता**

**लोहा | प्रतिनिधी**

आदरणीय प्राध्यापक मनोहर धोंडे सर हे नाव आजही अनेक राजकीय नेत्यांच्या उरात धडकी भरवणारे आहे. बहुजन समाजाच्या न्याय्य हक्कासाठी निर्भीडपणे लढणारे, अन्यायाविरुद्ध आक्रमक भूमिका घेणारे आणि तत्त्वांशी कधीही तडजोड न करणारे नेतृत्व म्हणून प्रा. मनोहर धोंडे सर ओळखले जातात. प्रा. मनोहर धोंडे सर ज्यांच्या बाजूने निवडणुकीत ठामपणे उभे राहतात, त्या उमेदवाराला एक वेगळाच आत्मविश्वास मिळतो. धोंडे सर आपल्या सोबत आहेत हीच बाब राजकीय गणिते बदलण्याची ताकद ठेवते, हे त्यांनी अनेकदा सिद्ध करून दाखवले आहे. उच्चशिक्षित, सुसंस्कृत, कर्तृत्ववान आणि प्रसंगी अत्यंत आक्रमक असे नेतृत्व म्हणून प्रा. मनोहर धोंडे सर लोहा-कंधार तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहेत. आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा यांसारख्या राज्यांमध्येही तरुणाईमध्ये त्यांची मोठी क्रेझ आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना, त्यांनी समाजकारणात प्रवेश केला आणि दि. २८ जानेवारी १९९६ रोजी शिवा संघटनेची स्थापना करून वंचित, शोषित आणि बहुजन समाजासाठी संघर्षाची नवी दिशा दिली. शिवा संघटनेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण भारतभर सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेत जनआंदोलन उभे केले. ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी आणि अडल्या-नडलेल्या जनतेच्या प्रश्नांसाठी ते नेहमी रस्त्यावर उतरलेले दिसतात. दिवस असो वा रात्र, कोणत्याही वेळी मदतीसाठी उपलब्ध असणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळेच जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल अपार विश्वास आणि आपुलकी आहे. राजकीय विचारधारा वेगवेगळी असली तरी प्रा. मनोहर धोंडे सर हे नाव सर्व समाजात आदराने घेतले जाते. विशिष्ट समुदायातून उभे राहून सर्व समाजात स्वीकारार्हता मिळवणे सोपे नसते, मात्र त्यांनी हे करून दाखवले आहे. त्यांच्या सोबत कार्य करणारे कार्यकर्ते विविध जाती-धर्मांतून आलेले आहेत, हे त्यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाचे प्रतीक आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात नवे पर्व सुरू करत, गेल्या दोन वर्षांपासून सर्व समाजासाठी आणि प्रामाणिक राजकारणासाठी त्यांनी निर्णायक पाऊल उचलले. सन २०२४ मध्ये लातूर-उदगीर येथे सेवा जनशक्ती पार्टी या नव्या



राजकीय पक्षाची स्थापना करून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात नवा पर्याय उभा केला. पक्ष स्थापनेनंतर अल्पावधीतच त्यांनी आपली ताकद दाखवून दिली. लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत, सेवा जनशक्ती पार्टीच्या माध्यमातून इतर पक्षांशी युती करून आपल्या पक्षाचा उमेदवार संचालक म्हणून विजयी करून दाखवला त्यानंतर कंधार नगरपालिकेत सेवा जनशक्ती पार्टीचा नगरसेवक निवडून येणे, हा त्यांच्या नेतृत्वाचा दुसरा महत्त्वाचा विजय ठरला आहे. हे यश केवळ सुरुवात असून, येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या नेतृत्वाखाली सेवा जनशक्ती पार्टी अधिक भक्कम यश मिळवेल, अशी जनतेमध्ये ठाम अपेक्षा निर्माण झाली आहे. शांत, संयमी, अभ्यासू आणि वेळप्रसंगी अत्यंत आक्रमक असा त्यांचा स्वभाव युवा पिढीवर खोलवर प्रभाव टाकतो. समाजकारण आणि राजकारणात सक्रिय व्हायचे असेल, तर प्रा. मनोहर धोंडे सर यांचा आदर्श घेणे ही काळाची गरज आहे. २ फेब्रुवारी या त्यांच्या वाढदिवसानिमित्त ईश्वरचरणी हीच प्रार्थना - आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी लाभो आणि आपले नेतृत्व अधिक बळकट होवो. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**शुभेच्छुक-राजकुमार पिलोळे खडक मांजरीकर तालुकाध्यक्ष - शिवा विद्यार्थी आघाडी, तालुका लोहा**

# साप्ताहिक संपादकांसाठी ठाण्यात एक दिवसीय कार्यशाळा व अधिवेशन संपन्न

### मूलभूत पत्रकारिता,आरएनआय-पीआयबी नियम,डिजिटल माध्यमे व पर्यावरण विषयावर सखोल मार्गदर्शन

### साप्ताहिक संपादक असोसिएशनच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण

**ठाणे | प्रतिनिधी**

साप्ताहिक संपादक असोसिएशनच्या वतीने ठाणे येथील मराठी ग्रंथ संग्रहालयात आज संपादकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा व अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार सदानंद खोपकर, डिजिटल माध्यम समस्यांवर मार्गदर्शन करणारे कन्सल्टंट युवराज आर्य, ॲड. स्मिता चिपळूणकर (जर्नलिस्टस असोसिएशनच्या राष्ट्रीय अध्यक्ष) तसेच पर्यावरण रक्षक विजयकुमार कट्टी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यशाळेला प्रारंभ झाला.

ज्येष्ठ पत्रकार सदानंद खोपकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मोबाईल आणि सोशल मीडियामुळे आजची पत्रकारिता भरकटत चालली आहे. मोबाईलवर दिसणारी प्रत्येक गोष्ट बातमी नसते. पत्रकारांनी वाचनाची सवय वाढवली पाहिजे तसेच स्वतःचे लेखन सातत्याने केले पाहिजे. वाचन व लेखनातूनच खरी आणि दर्जेदार पत्रकारिता घडते. तसेच प्रत्येक पत्रकार संपादकांनी एकतरी पुस्तक काढले पाहिजे. तसेच साप्ताहिक वृत्तपत्र चालवताना येणाऱ्या विविध अडचणींवर त्यांनी मार्गदर्शन केले.



डिजिटल माध्यमांच्या संदर्भात युवराज आर्य यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देत सांगितले की, सध्या विविध डिजिटल ॲप्सच्या माध्यमातून माहिती संकलन व लेखन सुलभ झाले आहे. मुलाखत किंवा एखादी बातमी घटनाक्रमाच्या आधारे डिजिटल साधनांवर मांडल्यास उत्तम लेखन तयार होऊ शकते. मात्र, या माध्यमांवर कधी कधी चुकीची माहितीही दिली जाते, त्यामुळे पत्रकारांनी मिळालेल्या माहितीची सत्यता तपासणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

आरएनआय व पीआयबी या केंद्र सरकारच्या संस्थांमार्फत लागू करण्यात आलेल्या नव्या नियम व कायद्यांबाबत ॲड. स्मिता चिपळूणकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. वृत्तपत्र अपलोड करणे, आवश्यक कागदपत्रांची नोंद, पासवर्डची सुरक्षितता, आयडी इतरांना न देणे, मासिक व साप्ताहिक वृत्तपत्रांचे अंक वेळेवर पीआयबीकडे सादर करणे, वार्षिक विवरण मध्ये वृत्तपत्राचा खप, वितरित प्रती, छापील अंकांची अचूक आकडेवारी भरणे या सर्व बाबी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये चूक झाल्यास किंवा आयडीचा गैरवापर झाल्यास वृत्तपत्र बंद होण्याचा धोका असल्याने संपादकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.पर्यावरण रक्षक विजयकुमार कट्टी यांनी पर्यावरण विषय हा पत्रकारितेचा महत्त्वाचा भाग असून, या विषयावर योग्य पद्धतीने लेखन कसे करावे, पर्यावरणाशी संबंधित समस्या कशा हाताळाव्यात आणि त्यावर जनजागृती कशी करता येईल याबाबत पत्रकारांना मार्गदर्शन केले. यासंदर्भात आवश्यक माहिती व लेखन साहित्य उपलब्ध करून देण्याची तयारीही त्यांनी दर्शवली. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा साप्ताहिक संपादक असोसिएशनचे अध्यक्ष राजेश जाधव यांनी संपादकांच्या विविध अडचणी, शासन दरबारी मांडलेल्या मागण्या आणि संघटनेच्या एकजुटीचे महत्त्व याबाबत माहिती दिली. कार्याध्यक्ष भीमराव धूळप यांनी सांगितले की, सर्व संपादक एकत्रित राहिल्यास निश्चितच परिवर्तन घडवून आणता येईल. अधिवेशन प्रवेश, यादीकरण व अधिस्वीकृतीधारक कार्डसंबंधी प्रश्न सोडवण्यासाठीच या संघटनेची स्थापना करण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी संघटनेच्या उपाध्यक्षा सारिका शिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे व सहभागीं संपादकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# बुवाबाजी : आंबेडकरी विवेकाचा पराभव की सामाजिक आत्महत्या ?

भारतीय समाजाच्या इतिहासात अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक समस्या राहिलेली नाही; ती सत्ता, अर्थकारण आणि मानसिक गुलामी यांचे सर्वात प्रभावी साधन बनली आहे. विज्ञान, शिक्षण आणि लोकशाही यांच्या युगातही बुवाबाजी टिकून आहे, याचा अर्थ समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केला असला तरी विवेकाचा स्वीकार केलेला नाही. विदर्भातील विक्तूबाबा ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती संपूर्ण समाजाच्या वैचारिक अपयशाची आरसेदर्शी कहाणी आहे. विदर्भातील मोठ्या बाबांपैकी एक म्हणजे विक्तूबाबा. नागपूर जिल्ह्यात त्याचे भव्य देवस्थान उभे आहे. आज हे देवस्थान कोट्यधीश बनले आहे. पण या देवस्थानामागील वास्तव वेगळे आहे. वास्तविक पाहता विक्तूबाबा हा मानसिकदृष्ट्या अपंग मुलगा होता. वयात आल्यानंतर स्त्रिया दिसल्या की चावायला धावायचा; म्हणून त्याच्या नातेवाईकांनी त्याच्या हातापायात बेड्या घातल्या. हाच पुढे बेडीवाले-विक्तूबाबा म्हणून प्रसिद्ध झाला. दलित समाजामध्ये या बाबाला फार मानाचे स्थान मिळाले आणि प्रचंड जनसमुदाय त्याच्यावर श्रद्धा ठेवू लागला. एका मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीला देवत्व देणे, त्याच्या विकृतीला चमत्काराचे रूप देणे आणि त्याच्या नावावर कोट्यवधी रुपयांचे देवस्थान उभे राहणे हे श्रद्धेचे नव्हे, तर विवेकाच्या पराभवाचे लक्षण आहे. समाजाने जेव्हा प्रश्न विचारणे थांबवले, तेव्हा बुवाबाजी जन्माला येते. बुवाबाजी ही अंधश्रद्धेची आधुनिक आवृत्ती आहे. ती देवाच्या नावाने नव्हे, तर माणसाच्या नावाने चालते, म्हणूनच ती अधिक धोकादायक आहे. बुद्धांचा विचार याच बुवाबाजीच्या मुळावर घाव घालणारा आहे.बालपणी मी स्वतः विक्तूबाबाला पाहिले आहे. सतत घाणेरड्या शिव्या देणारा, हातापायात बेड्या असणारा हा बाबा; ज्याच्या भोवती भक्तांचा गराडा असायचा. त्याच्या प्रत्येक पागल हावभावाचा भक्त आपापल्या परीने अर्थ काढायचे. मोठ्या प्रमाणावर पेढे, नारळ, पैसे बाबाला वाहिले जायचे आणि त्याच वस्तू पुन्हा दुकानांत विक्रीला ठेवण्यात यायच्या. टी.बी., महारोग आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे रुग्णही विक्तूबाबाकडे येताना मी पाहिले. त्याच्या नातेवाईकांशी संवाद साधल्यावर बाबाच्या कृपेने रोग बरे होतात हा केवळ विश्वास नव्हे, तर अनुभव असल्याचा दावा ऐकून मी स्तब्ध झालो. कारण विक्तूबाबांची आई महारोगाची रुग्ण होती आणि ती बाबा आमटेंच्या दवाखान्यात दीर्घकाळ उपचार घेत होती. विक्तूबाबाच्या घाणेरड्या शिव्यांतूनही चांगला अर्थ काढण्याचा भक्तांचा अट्टाहास विलक्षण होता. काही भक्त तर मुद्दाम बाबाला त्रास देत, जेणेकरून त्याने शिव्या द्याव्यात. त्या शिव्या मोजून काही लोक सट्टा-जुगार लावत असत. हा प्रकार केवळ हास्यास्पद नव्हे, तर समाजाच्या मानसिक अधःपतनाचे प्रतीक होता. आजही काही लोक लग्नाची पत्रिका समाजात वाटण्यापूर्वी विक्तूबाबाच्या चरणी ठेवतात. हा केवळ श्रद्धेचा प्रश्न नाही; तो मानसिक गुलामीचा पुरावा आहे. जीवनातील प्रत्येक निर्णय स्वतःच्या बुद्धीने घेण्याऐवजी बाबाच्या आशीर्वादावर अवलंबून राहणे म्हणजे विवेकाचा त्याग होय. बुद्धाने सांगितले अत्त-दीप-भव, म्हणजे स्वतःचा दिवा व्हा. पण आजचा समाज म्हणतो, बाबाचा दिवा व्हा. हा फरक केवळ शब्दांचा नाही; तो मानसिकतेचा आहे. बुद्धधम्माचा अर्थ देव बदलणे नव्हे, तर विचार बदलणे आहे. जो समाज बुद्धाचा धर्म स्वीकारूनही चमत्कार शोधतो, तो बुद्धाचा नाही, तर बुवांचा अनुयायी ठरतो. म्हणूनच बुवाबाजी ही केवळ धार्मिक समस्या नाही; ती बुद्धविचाराच्या पराभवाची चिन्हे आहेत. जर बुद्धाचा विचार खरोखर स्वीकारायचा असेल, तर बुवाबाजीला केवळ विरोध करणे पुरेसे नाही; तिच्या मुळावरच घाव घालावा लागेल. कारण बुद्धाचा मार्ग स्पष्ट आहे, श्रद्धेपासून विवेकाकडे, देवापासून मानवाकडे आणि चमत्कारापासून विज्ञानाकडे. बुद्धाने देव, चमत्कार आणि अंधश्रद्धा यांना थेट आव्हान दिले. कोणत्याही गोष्टीवर केवळ परंपरेमुळे, धर्मामुळे किंवा कोणाच्या सांगण्यामुळे विश्वास ठेवू नका; स्वतःच्या बुद्धीने तपासून पाहा हा बुद्धाचा मूलमंत्र होता. त्यामुळे बुद्धधम्म हा पूजा, कर्मकांड किंवा बाबागिरीचा धर्म नाही, तर विवेक, अनुभव आणि तर्काचा धर्म आहे. बुद्धाने सांगितले की दुःखाचे कारण बाहेर नाही; ते आपल्या आत आहे. त्यामुळे दुःखावर उपाय शोधताना देव, बाबा किंवा चमत्कार शोधण्याची गरज नाही; गरज आहे ती स्वतःच्या बुद्धीची. विडंबन असे की बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच बुवाबाजी फोफावली आहे. बुद्धाच्या नावाने धर्म स्वीकारणारा समाज बाबांच्या चरणी नतमस्तक होतो, ही केवळ विसंगती नाही; ती बुद्धविचाराची विटंबना आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत; त्यांनी त्याला विचार करण्याची शक्ती दिली. बाबासाहेबांचा धर्म हा देवाचा नव्हे, तर माणसाचा धर्म होता. बुद्धधम्म स्वीकारताना त्यांनी स्पष्ट सांगितले, श्रद्धा नव्हे, बुद्धी. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि देववाद यांना स्पष्ट नकार दिला. पण आज प्रश्न उभा राहतो, आपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत की त्यांच्या नावावर जगणारे भक्त? हजारो घरांमध्ये बाबासाहेब आंबेडकर आणि विक्तूबाबांचे फोटो शेजारी लावलेले दिसतात. हा केवळ प्रतीकात्मक विरोधाभास नाही; तो वैचारिक शून्याचा पुरावा आहे. दीक्षाभूमी ही केवळ भूभाग नाही; ती विवेकाची क्रांती आहे. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी लाखो लोकांना अंधश्रद्धेपासून मुक्त केले, त्याच भूमीवर विक्तूबाबाचा सत्कार होणे म्हणजे बुद्धिवादाची सार्वजनिक हत्या आहे. याविरोधात मोजकेच बुद्धिवादी आवाज उठले; बहुसंख्य आंबेडकरी नेते मात्र गप्प राहिले. का? कारण भक्तांचा रोष, मतांचा तोटा आणि राजकीय नुकसान. इथे प्रश्न उभा राहतो की, राजकारणासाठी विवेकाचा बळी देणे ही आंबेडकरी चळवळ आहे का? जर हो, तर बाबासाहेबांचा विचार केवळ निवडणूक घोषणापत्रापुरता मर्यादित राहिला आहे, हे स्वीकारावे लागेल.विक्तूबाबाचे देवस्थान आज कोट्यधीश आहे. हजारो भक्त दरवर्षी दर्शनाला येतात. नारळ, पेढे, पैसे, वस्त्र, दान या सगळ्यांतून एक प्रचंड अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. बुवाबाजी ही आज केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक उद्योग बनली आहे. प्रश्न असा आहे की, हा पैसा कुठून येतो? तो येतो गरीब, असुरक्षित आणि असहाय लोकांकडून. जेव्हा राज्य त्यांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगार देण्यात अपयशी ठरते, तेव्हा ते बाबांकडे धाव घेतात. म्हणजेच बुवाबाजी ही व्यवस्थेच्या अपयशाची उपज आहे. टी.बी., कॅन्सर, महारोग यांसारख्या रोगांवर बाबाच्या कृपेने उपचार होतात, असा विश्वास म्हणजे विज्ञानाचा अपमान आहे. पण या विश्वासामागे असलेली मानसिकता अधिक धोकादायक आहे, आपण स्वतः काही करू शकत नाही, कोणीतरी चमत्कार करावा लागेल. ही मानसिकता म्हणजेच मानसिक गुलामी.सामान्यतः अंधश्रद्धा ही ग्रामीण समाजाशी जोडली जाते. पण दलित समाजात तिचे अस्तित्व अधिक खोलवर आहे. कारण दलित समाजाने ऐतिहासिकदृष्ट्या सतत अपमान, शोषण आणि अन्याय सहन केला आहे. त्यामुळे त्याच्या मनात असुरक्षितता, भीती आणि आश्रयाची गरज निर्माण झाली आहे. बुवाबाजी ही त्या मानसिकतेचा परिणाम आहे. बाबासाहेबांनी दलित समाजाला मानसिक गुलामीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. पण सामाजिक चळवळ दुर्बल झाल्यामुळे ती गुलामी नव्या रूपात परत आली, बुवाबाजीच्या रूपात. आज आंबेडकरी चळवळ राजकीयदृष्ट्या सक्रिय आहे. निवडणुका, मोर्चे, सभा, घोषणा हे सगळे सुरू आहे पण सामाजिक चळवळ मात्र निष्प्रभ झाली आहे. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर सामाजिक परिवर्तनाची मशाल कोणीच उचलली नाही. परिणामी, बाबासाहेबांचा फोटो सर्वत्र दिसतो; पण त्यांचा विचार समाजात दिसत नाही. आंबेडकरी चळवळ जर खरोखरच बाबासाहेबांची वारसदार असती, तर बुवाबाजीविरोधात ती सर्वात पुढे उभी राहिली असती. पण वास्तव उलट आहे. बुवाबाजीवर टीका केली की भावना दुखावतात असा युक्तिवाद केला जातो. प्रश्न असा आहे, भावना जपायच्या की विवेक?बुद्धाने सांगितले काहीही अंधश्रद्धेने स्वीकारू नका. बाबासाहेबांनी त्याच विचाराला आधुनिक संदर्भ दिला. पण आज बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच अंगात येणारे बुद्ध, अंगात येणारे बाबासाहेब दिसतात. हा विरोधाभास केवळ हास्यास्पद नाही; तो धोकादायक आहे. कारण जेव्हा विचाराऐवजी चमत्कार महत्त्वाचा ठरतो, तेव्हा समाज पुन्हा मध्ययुगात परत जातो. प्रश्न विक्तूबाबाचा नाही; प्रश्न आपला आहे. विक्तूबाबा ही समस्या नाही; समस्या म्हणजे त्याला देवत्व देणारा समाज. विक्तूबाबा उद्या नाहीसा झाला, तरी उद्या दुसरा बाबा तयार होईल. कारण समाजाची मानसिकता बदललेली नाही. जो समाज बाबासाहेबांच्या नावाने राजकारण करतो, तोच समाज बुवांच्या चरणी नतमस्तक होतो, हा विरोधाभास केवळ वैचारिक नाही, तर नैतिकही आहे. आज समाजासमोर प्रश्न स्पष्ट आहे, आपण बाबासाहेबांच्या बाजूने उभे राहणार की बुवांच्या? बाबासाहेब म्हणजे प्रश्न विचारण्याची परंपरा. बुवा म्हणजे प्रश्न न विचारण्याची गुलामी. बाबासाहेब म्हणजे विज्ञान, तर्क आणि मानवतावाद, बुवा म्हणजे चमत्कार, अंधश्रद्धा आणि भीती. दोन्ही एकत्र चालू शकत नाहीत.आता वेळ आली आहे की आंबेडकरी समाजाने आत्मपरीक्षण करावे. बाबासाहेबांचे फोटो घरात लावणे पुरेसे नाही; त्यांचा विचार जीवनात उतरवावा लागेल. जर तुमच्या घरात बुवाचा फोटो आहे, तर बाबासाहेबांचा फोटो केवळ सजावटीचा आहे, हे स्वीकारावे लागेल. जर तुम्ही बुवांच्या चरणी नतमस्तक होता, तर बाबासाहेबांच्या विचारांशी तुम्ही द्रोह करत आहात, हे मान्य करावे लागेल. आज गरज आहे ती निर्भीड वैचारिक क्रांतीची. बुवाबाजी विरोधात उभे राहणे म्हणजे धर्मविरोध नाही; ते मानवतावादाचे समर्थन आहे. अंधश्रद्धेविरोधात बोलणे म्हणजे समाजविरोध नाही; ते समाजाच्या मुक्तीसाठीचे युद्ध आहे. जर आंबेडकरी समाजाने आता प्रश्न विचारले नाहीत, तर भविष्यात बाबासाहेबांचा विचार केवळ पुस्तकांमध्ये उरेल आणि बुवाबाजी समाजावर राज्य करेल. म्हणूनच आजच निर्णय घ्या, देव नव्हे, विचार स्वीकारा! चमत्कार नव्हे, विज्ञान स्वीकारा! बुवा नव्हे, बाबासाहेब स्वीकारा! कारण विवेक हीच खरी क्रांती आहे आणि विवेकाशिवाय कोणतीही मुक्ती शक्य नाही !

**प्रविण बागडे,नागपूर**

**९९२३६२०९१९**

# राज्यातील दोन लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन थकल्याने त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांची उपासमार थांबविण्याची मागणी

## आयुक्त,ए.बा.वि.से.योजना श्री.कैलास पगारे यांना दिले निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**जळगाव । जितु इंगळे**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सुमारे दोन लाख अंगणवाडी सेविका मदतनीस गेली अनेक वर्ष कार्यरत आहेत. या महिला कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारच्या हिस्स्याचे दोन महिन्यापासून मानधन रखडल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. अंगणवाडी सेविका मदतनीस म्हणून विधवा घटस्फोटीत,दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील असून बहुसंख्य एकल महिला आहेत.त्यांच्यावर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी असल्याकारणाने थकीत मानधनामुळे त्यांचे घरातील आर्थिक गणिते बिघडली आहेत. मध्यवर्ती सरकारने अंगणवाडी मदतनीसांना त्यांच्या हिस्साचे मानधन दिले आहे परंतु सेविकांना दिले नाही. त्यामुळे त्यांच्यात प्रचंड नाराजी पसरली आहे.केंद्र सरकार सेविकांना ४५००/- तर मदतनीसांना २२५०/- इतके अल्प मानधन देते.अंगणवाडी कर्मचारी योजनेचे काम गावपातळीवर प्रभाविपणे पार पडतात.त्यांच्या मानधनाची ६०% हिस्सा राज्य सरकार आणि ४० टक्के हिस्सा केंद्र सरकार अशी विभागणी केली आहे. अंगणवाडी सेविका मदतनीस यांचे मानधन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होते.परंतु डिसेंबर २०२५ पासून सेविकांचे प्रत्येकी चार हजार पाचशे रुपयांचा केंद्र सरकारचा हिस्सा असलेले मानधन जमा झालेले नाही. राज्य सरकारने मात्र त्यांच्या हिस्साच्या मानधनाची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा केली आहे.तसेच मदतनीसांना केंद्र आणि राज्य सरकारच्या हिस्स्याची रक्कम बँक खात्यात जमा केली आहे. परंतु पुरेशे मानधन दिले नाही यावरून शासनाने अंगणवाडी सेविका मदतनीसांच्या मानधनाकडे दुर्लक्ष केले आहे. तर दुसरीकडे यांच्याकडून योजनेच्या कामाव्यतिरिक्त विविध योजनांचे कामे सक्तीने करून घेतली जातात. तरीही त्यांना मिळणारे अल्पशे मानधन देण्यासही शासन मात्र नेहमीच टाळाटाळ करत असते. त्यामुळे अंगणवाडी सेविका मदतनीसांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झालेली आहे. केंद्र सरकारच्या हिस्साचे मानधन न मिळाल्याने त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. अंगणवाडी सेविका मदतनीस यांचे मानधन कधी राज्य सरकार तर कधी मध्यवर्ती सरकार थकवते. परिणामी त्यांना अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून डिसेंबर २०२५ पासून केंद्र सरकारच्या हिस्साचे तातडीने अदा करावे. अशी आग्रही मागणी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त श्री.कैलास पगारे यांच्याकडे अंगणवाडी कर्मचारी युनियनचे रामकृष्ण बी.पाटील आणि युवराज बैसाणे यांनी आज निवेदन देत केली. त्यावर केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झाल्याबरोबर अंगणवाडी सेविका मदतनीसांना थकित मानधन बँक खात्यात जमा करण्यात येईल असे आयुक्त यांनी सांगितले.



# भाग्यनगर सरस्वती साहित्य सेवा संगमचा २३ वा स्थापना दिन सोहळा १ फेब्रुवारीला उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**हैदराबाद । प्रतिनिधी**

साहित्य, संस्कृती व सामाजिक जाणीवांचा वारसा जपणाऱ्या भाग्यनगर सरस्वती साहित्य सेवा संगम या संस्थेचा २३ वा स्थापना दिन सोहळा रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे स्थळ Gnosis Vaidya Vidhya Prabodhini, मेट्रो पिलर क्र. १५५५, पोचम्मा टेंपल लेन, चैतन्यपुरी, दिलसुखनगर, हैदराबाद असे आहे. सन २००३ मध्ये वसंत पंचमीच्या शुभमुहूर्तावर स्थापन झालेल्या या संस्थेने गेल्या २३ वर्षांत साहित्यिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. विविध काव्यसंमेलने, साहित्यिक कार्यक्रम, स्पर्धा व समाजप्रबोधन उपक्रमांद्वारे संस्थेने अनेक नवोदित व प्रगल्भ साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून श्री रोहित चेबरोलू (Centre Head Academic Operation, HOD Physics) उपस्थित राहणार आहेत. तसेच 'साप्ताहिक महिमा खादीचा'चे मुख्य संपादक श्री गजानन गंगाधरराव बिडकर यांची विशेष उपस्थिती लाभणार असून संस्थापक-अध्यक्ष श्री रविंद्रनाथसिंह चौहान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष उदयकुमार नाईक व उपाध्यक्ष नंदकुमार बैजवाडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी जयेशकुमार महेन्द्रा, मिलिन्द पाठक, तुम्मा जनार्दन, राघवेंद्रराव देशपांडे, लता संघी आदी सभासदांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. स्थापना दिनानिमित्त साहित्यप्रेमी, कवी, लेखक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### जवळबन–लाडेगाव शिवारात अज्ञात हिंस्र प्राण्यांचा वावर

# जवळबन येथील ऊसाच्या शेतामध्ये गुरुवारी बिबट्याच्या पायाचे ठसे आढळले!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लाडेगाव शिवारातील पावनधाम कॉर्नर जवळील सर्व्हे नंबर १३५ मध्ये अमीन दस्तगिर शेख यांच्या शेतात दावणीला बांधलेल्या शेळ्या व बोकडांवर आज शनिवारी पहाटे २ ते ५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात हिंस्र वन्य प्राण्यांकडुन जीवघेणा हल्ला करण्यात आला असून शेतकऱ्यांनी घाबरुन जाऊ नये सावध रहावे,आपले पशुधन सुरक्षित बंधीस्त गोठ्यात ठेवण्याचा प्रयत्न करावा.
रात्री शेतीत भिजवण्या साठी जाताना एकटे जाऊ नये समूहाने जावे.हातात उजेडासाठी बॅटरी,मोठी लाठी सोबत ठेवावी.शक्य असल्यास पाळीव कुत्रे सोबत घ्यावे.किल्लेधारूर वनविभागाकडे आवश्यक ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली असुन वन अधिकारी पवार साहेब,आर एफ ओ पाईक साहेब,भालेराव साहेब,गुणवंत साहेब हे आपल्या टीमसोबत जातीने ठिकाणावर पंचनामा करत आहेत.
तसेच यापुढे दैनंदिन धारूर वनविभागामार्फत चंदनसावरगाव,होळ, जवळबन,भाटुंबा, लाडेगाव,बोरीसावरगाव औरंगपूर,सावळेश्वर पैठण आदी लगतच्या शिवारात पेट्रोलिंग वाढवण्याची विनंती केली आहे.

**–श्री.कुलदीप करपे**
**जिल्हाध्यक्ष,क्रांतिकारी शेतकरी संघटना,बीड जिल्हा**

## केज येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय येथे हुतात्मा दिनानिमित्त श्रद्धांजली कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय येथे तालुका विधी सेवा समिती व वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा दिनानिमित्त भावपूर्ण वातावरणात श्रद्धांजली कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमात देशासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना तसेच दिवंगत नेते अजित पवार व वैमानिक,सुरक्षा रक्षक, हवाई सुंदरी यांना दोन मिनिटांचे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
या वेळी जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.एस.बी.भाजीपाले साहेब,जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती आर.के.शेख मॅडम, न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) श्री. एस.एस.बडगुजर साहेब व न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) श्रीमती पी.व्ही.चव्हाण मॅडम,वकील संघाचे अध्यक्ष अड.एम.एस.लाड



यांच्यासह न्यायालयातील अधिकारी,कर्मचारी तसेच केज वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी हुतात्म्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.यावेळी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करण्यात आले.न्याय व्यवस्थेतील सर्व घटकांनी संविधान मूल्यांचे जतन करण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त केला.

# अपहरण केलेल्या ३ महिन्याच्या बालिकेचा शोध लावण्यास मुंब्रा पोलिसांना यश

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

दि. २२/०१/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वा. चे सुमारास डीसीबी बँकेच्या सामेरील खाडीमशिनकडे जाणा-या रस्त्यावर, मुंब्रा, ठाणे येथे फिर्यादी फरजाना मन्सुरी, वय २३ वर्षे, रा. ठि. रूम नं ७०२, अजमेरी हाईटस, कौसा, मुंब्रा, ठाणे हया त्यांच्या दोन्ही मुलींना कडेवर घेवुन रस्ता क्रॉस करत होती तर आफीया (वय ३ महीने) हीस अनोळखी महीलेने फिर्यादी छोटी बच्ची को मेरे गोद मे देदो मैं भी सामने हि जा रही हू प्रसंगी आफीया हिस तिच्याकडे दिले असता आरोपी महिलेने मुलगी पळुन नेवुन अपहरण केले म्हणुन मुंब्रा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्र. ८९/२०२६ बी एन एस १३७ (२) प्रमाणे दिनांक २२-०१-२०२६ रोजी दाखल करण्यात आला होता.
सदर गुन्ह्यातील अपहरित मुलगी नामे आफिया वय०३ महिने हिचा शोध घेणे करिता तात्काळ ४ तपास पथके तयार करून तपास चालू करण्यात आला. अपहरीत लहान मुलीचा शोध घेताना घटनास्थळ डीसीबी बँकेच्या समोरील रोडवरील सीसीटीव्ही फुटेज वरून अपहरण करणारी एक बुरखाधारी महिला असल्याचे निष्पन्न झाले. सदर महिला ही रिक्षामध्ये बसून मुंब्रा स्टेशन पर्यंत आलेली दिसत होती. त्यानंतर सदर महिलेच्या सारखी दिसणारी व बुरख्याच्या आत तिच्या हातात असलेल्या बाळाच्या पायातील सॉक्स एक दिड इंच बाहेर आलेला होत्या त्या आधारे महिलेचा शोध घेत असताना मुंब्रा ते वांगणी येथील प्रत्येक रेल्वे स्टेशन व आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सदर महिला ही कोणत्याही रेल्वे स्टेशन वर उतरलेली दिसून येत नव्हती. सदर तपासामध्ये कोणता तरी तपासाचा धागा आपल्या हातून सुटत असल्याचे वाटत असल्याने गुन्हे शोध पथकाचे स. पो.नि सावंत व टिम तपास पथकातील कर्मचारी यांचे कौशल्यपूर्ण तपास व तांत्रिक तपास तसेच गुप्त बातमीदार यांच्या मदतीने त्या महिलेस तिचे घरातून तपासकामी ताब्यात घेतले. त्या महिलेचे नाव नसरीन इकलाख शेख असल्याचे तपासात निष्पन्न झाले, त्यानंतर तिच्याकडे तपास केला असता तिने सदरचे बाळ हे अकोला जिल्ह्यातील खेटरी ता. पातुर येथे असल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच तपासात खेटरी गाव, जिल्हा अकोला येथे येऊन लहान बाळ व आरोपीत मोहम्मद मुजीब गुलाब वय -३१ वर्ष, रा. हाजी नगर खेटरी गाव व त्याची पत्नी खैरूणिसा मुजीब मोहम्मद, वय ३० वर्ष, रा. सदर यांना ताब्यात घेण्यात आले. सदर तपासामध्ये मुंब्रा ते सीएसएमटी, मुंबई व मुंब्रा ते टिटवाळा, दांगणी दरम्यानचे सुमारे १६०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून, गुप्त बातमीदार मार्फत तसेच तांत्रिक तपास करुन सहा दिवस तररोज १६ ते १८ तास अहोरात्र तपास करून सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

## धावत्या रेल्वेतून पडलेल्या जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

किनवट तालुक्यातील बोधडी येथील रहिवासी मारोती रामा बोईनवाड (वय ३३) यांचा धावत्या रेल्वेतून पडून झालेल्या अपघातानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दि. २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री १०.१० वाजण्याच्या सुमारास मारोती बोईनवाड हे किनवट ते तिरुपती कृष्णा एक्सप्रेस या रेल गाडीने प्रवास करीत होते. याच दरम्यान बोधडी रेल्वे स्टेशन परिसरात ते धावत्या गाडीतून अचानक खाली पडल्याने गंभीर जखमी झाले.अपघातानंतर त्यांना तात्काळ उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना मुंबई येथील सर जे. जे. रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे वैद्यकीय उपचार सुरू असताना आज दि. २९ जानेवारी २०२६ रोजी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बोईनवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी नोंद घेतली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे समजते.

## वादळी कट्टा

घरकूल गरिबासाठी, फलकावरची घोषणा,
खाली मात्र दलालांची ठरलेलीच योजना.
फाईल हलते टेबलावर, हात भरले तरच चाल,
पैसा नसेल खिशात, तर हक्कही होतो सवाल.

झोपडीचे स्वप्न विकले, नोटांच्या गठ्ठ्यावर,
गरिबाचा संसार मांडला दलालांच्या कट्ट्यावर.
मंजुरी कागदावर, घर मात्र न दिसे ठायी,
भ्रष्टाचाराच्या विटांनी उभी राहिली सत्ताई.

ज्याच्या अंगावर छप्पर, त्यालाच मिळते घर,
उघड्या आकाशाखाली न्यायाचा होतो चुराडा भर.
योजना जनतेसाठी, पण खेळ मोजक्यांचा,
घरकूल नाही राहिले, हे हक्क दलालांचा!

**संपादक**
**अजय भांगे**



# ठाण्याच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपोळकर तर उपमहापौरपदी भाजपचे कृष्णा पाटील

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्याच्या महापौर पदासाठी अनेक नावांची चर्चा होती, मात्र कोपरी परिसरातील शिवसेना नगरसेविका शर्मिला पिंपोळकर यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. महापौर पदाच्या रेसमध्ये वागळे मधून दर्शना जानकर तसेच वर्तकनगर मधून विमल भोईर, दिव्यातून दिपक जाधव यांच्या नावाचीही चर्चा होती. मात्र महापौर पदासाठी आज नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून सौ. पिंपोळकर यांचे नाव निश्चित झाले आहे. तर दुसरीकडे भाजपने विरोधी पक्षात बसण्याचा निर्णय गुंडाळला असून सत्तेत सामील होत उपमहापौर पदी कृष्णा पाटील यांची वर्णी लावली आहे. त्यामुळे ठाणे महापालिकेत आता शिवसेनेचा महापौर आणि भाजपचा उपमहापौर असे सत्तेचे समीकरण बनले आहे. नुकत्याच झालेल्या ठाणे महापालिकेच्या निवडणुकीमध्ये शिंदेच्या



शिवसेनेला पूर्ण बहुमत मिळाले आहे. शिवसेनेचे ७५ नगरसेवक निवडून आले असून भाजपचे २८ नगरसेवक निवडणून आले आहेत. त्यामुळे महापौर पदी शिवसेनेचाच महापौर बसणार हे निश्चित झाले होते. महापौर पदासाठी अनुसूचित जातीचे आरक्षण पडल्याने महापौर पदासाठी दर्शना जानकर, विमल भोईर, पद्मा भगत, दिपक जाधव आणि शर्मिला पिंपोळकर यांच्या नावाची चर्चा होती. मात्र आज महापौर पदासाठी नामनिर्देशन दाखल करण्यात आले. यामध्ये महापौर पदासाठी शर्मिला पिंपोळकर तर उपमहापौर पदासाठी भाजपच्या कृष्णा पाटील यांनी आपले नामनिर्देशन दाखल केले. यामध्ये शर्मिला पिंपोळकर यांचे नाव निश्चित करण्यात आले तर उपमहापौर पदासाठी कृष्णा पाटील यांची वर्णी लागली आहे.ठाणे महापालिकेत योग्य पद मिळाले नाही तर विरोधात बसण्याची भूमिका घेणाऱ्या भाजपने आपला निर्णय बासनात गुंडाळला. ठाण्याच्या उपमहापौर पदी भाजपच्या कृष्णा पाटील यांची वर्णी लागली आहे. सत्तेत महत्वाचा वाटा मिळावा यासाठी महत्वाच्या समितीवर भाजपने मागणी केली आहे. यामध्ये स्थायी समिती, परिवहन समिती, शिक्षण मंडळ प्रभाग समितीमध्येही भाजप आजही आग्रही आहे. प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार निरंजन डावखरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, भाजप जिल्हाध्यक्ष संदीप लेले, भाजप गटनेते मुकेश मोकाशी यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व अजितदादा पवार यांना साकेगाव येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली

दैनिक वादळ वार्ता
**बारामती । प्रतिनिधी**

काल सकाळी बारामती येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत निधन झाल्याचे समजल्याने सपूर्ण महाराष्ट्र मध्ये दुःखाचे सावट निर्माण झाले आहे. राज्यभर आणि देशाच्या राजकारणा मध्ये आपल्या धडाडीच्या कार्यामुळे आणि आणि कर्तृत्वाच्या जीवावर जनतेच्या मनावर प्रभाव असणारे नेते म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते त्या नेत्याला आज संपूर्ण राज्यात आज दुःखद अंतःकरणाने श्रद्धांजली वाहण्यात आली आहे. आज प्रसंगी साकेगाव येथे स्व अजितदादा पवार यांना साकेगाव ग्रामस्त यांच्या वतीनेही अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्यांना याठिकाणी श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रसंगी साकेगाव येथील सर्व राजकीय पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते. अँड चंद्रकांत सातपुते. वृद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक श्री साहेबराव सातपुते . सुधाकर पाटील डांगे. म्हातारदेव सातपुते. देविदास वाघ.रावसाहेब पठारे. मार्केट कमिटीचे उपसभापती विष्णू सातपुते.मनसेचे लक्ष्मण डांगे . राहुल देवढे.माजी सरपंच रामदास सातपुते आणि शासनाच्या वतीने ग्राम महसूल अधिकारी बाळासाहेब केदार इत्यादींनी आपआपल्या




भावना व्यक्त केल्या. प्रसंगी महिला सरपंच अलकाताई सातपुते . नवाबबाई शेख. गोकुळ सातपुते. शोकत सय्यद आबासाहेब चन्ने.संतोष सातपुते. चंद्रकांत देवढे राहुल सातपुते. ग्रामपंचायत कर्मचारी सतीश साठे. रुपेश पठारे.आदीसह ग्रामस्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.प्रसंगी अजितदादा पवार यांच्या आठवणींनी बोलणारे वक्ते आपल्या भावना व्यक्त करताना गहिवरून आल्याचे दिसून आले. अजितदादा पवार यांच्या आठवणी सांगणारे आणि ऐकणारे हे सर्व जण आपल्यातील किंवा आपल्या घरातील एक व्यक्ती आज निघून गेल्याचे भाव व्यक्त करत होते. या दुःखद अंतःकरणाने आज संपूर्ण महाराष्ट्राने या नेत्याला निरोप दिला.**आज अजित पवार यांच्या निधनाच्या दुखद प्रसंगी पाथर्डी शहर आणि तालुक्यातील साकेगाव सह अनेक गावातील मंडळींनी स्वयंस्फूर्तीने गावे आणि व्यवहार बंद ठेवली होती.**

# अक्कलकुवा तालुक्यातील बेडाकंड येथे वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू

## मोलगी पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद; परिसरात भीतीचे वातावरण

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या बेडाकंड (पुंजारपाडा) येथे एका वृद्ध व्यक्तीवर जंगली हिंस्त्र प्राण्याने झोपेत असताना हल्ला केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने ७६ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत भीतीचे सावट पसरले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बेडाकंड येथील रहिवासी गोवल्या रुप्या तडवी (वय ७६ वर्षे) हे मंगळवारी (दिनांक.२७ रोजी) रात्री नेहमीप्रमाणे आपल्या घराच्या पडवीतील पलंगावर झोपलेले होते. रात्री नऊ ते बुधवारी पहाटे सहा वाजेच्या दरम्यान, दबा धरून बसलेल्या एका अज्ञात जंगली हिंस्त्र प्राण्याने त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात गोवल्या तडवी यांच्या शरीरावर गंभीर जखमा झाल्या. रुग्णालयात नेण्यापूर्वीच प्राणज्योत मालवलीसकाळी ही घटना उघडकीस येताच मयताचा मुलगा काल्या तडवी यांनी स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने वेली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दुपारी १२ वाजून ५ वाजता त्यांना 'मयत' घोषित केले.

या प्रकरणी मोलगी पोलीस ठाण्यात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १९४ अन्वये पोलीस हेड कॉन्स्टेबल मंगला पाडवी यांनी अकस्मात मृत्यू नुसार नोंद घेतली असून.सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक जयसिंग पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुजित पाटील या घटनेचा अधिक तपास करत आहेत. घटनेची माहिती अक्कलकुवा येथील कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

या घटनेमुळे बेडाकंड परिसरात वन्य प्राण्यांचा वावर वाढल्याचे सिद्ध झाले असून, वनविभागाने तात्काळ या नरभक्षक किंवा हिंस्त्र प्राण्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



## धडगावमध्ये राज्य उत्पादन शुल्क पथकावर थरारक हल्ला

# १९ लाखांचा जप्त मुद्देमाल आरोपींनी हिसकावला;१० जणांविरोधात गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात कायदा-सुव्यवस्थेला थेट आव्हान देणारी धक्कादायक घटना घडली आहे. अवैध दारूविरोधात कारवाईसाठी गेलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकावर जमावाने जीवघेणा हल्ला करत जप्त केलेला सुमारे १९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना २९ जानेवारी रोजी दुपारी घडली.

धडगाव तालुक्यातील निगदी फाटा परिसरात राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक राजेश सपकाळ हे आपल्या पथकासह एका शेतात छापा टाकण्यासाठी गेले होते. या कारवाईत पथकाने अवैध दारूचे २०० बॉक्स तसेच एक महिंद्रा पिक-अप वाहन जप्त केले होते.



कारवाई सुरू असतानाच आरोपी बुधा झांगडे व सुरेश झांगडे यांनी १० ते १२ जणांच्या टोळीसह घटनास्थळी धाव घेतली. आरोपींनी शिवीगाळ, आरडाओरडा करत दगडफेक केली तसेच,

गाडी पुढे नेली तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत पथकाला घेराव घातला. यानंतर जप्त केलेली १४ लाख ४० हजार रुपयांची दारू व ५ लाख रुपयांचे वाहन असा एकूण १९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या डोळ्यादेखत पळवून नेण्यात आला.

या प्रकरणी धडगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(२), १२५, १२६(२), ३५१(३), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, बुधा झांगडे, सुरेश झांगडे यांच्यासह एकूण १० जणांविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. सरकारी कामात अडथळा आणणे, दगडफेक व लुटमार केल्याप्रकरणी पोलीस आरोपींचा कसून शोध घेत आहेत.भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे उत्पादन शुल्क व पोलीस प्रशासनाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आरोपींना अटक कधी होणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# रावेर तहसील कार्यालयातून जप्त ट्रॅक्टरची चोरी; ट्रॅक्टरसह दोघे ताब्यात



दैनिक वादळ वाता

**जळगाव । जितु इंगळे**

रावेर तहसील कार्यालयाच्या आवारातून अवैध गौण खनिज प्रकरणी जप्त करण्यात आलेले सुमारे ३ लाख ७५ हजार रुपये किमतीचे दोन ट्रॅक्टर ट्रॉलीसह चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली होती. मात्र रावेर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोन्ही ट्रॅक्टर जप्त करून दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, अवैध गौण खनिज वाहतूक करत असलेले एम.एच. १९ ए.एन. ४४५२ व एम.एच. १९ पी. ३४४० क्रमांकाचे दोन ट्रॅक्टर ट्रॉलीसह महसूल विभागाने जप्त केले होते. हे ट्रॅक्टर रावेर तहसील कार्यालयाच्या आवारात उभे करण्यात आले होते. मंगळवारी (दि. २७) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास, दोन व्यक्तींनी सदर ट्रॅक्टर चोरी करून नेल्याची बाब निदर्शनास आली. याप्रकरणी मंडळ अधिकारी निंभोरा रवीशंकर वानखेडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून संदीप हिरामण कोळी व महेंद्र पंजाब तायडे (दोघेही रा. सिंगनूर, ता. रावेर) यांच्याविरुद्ध रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्यानंतर रावेर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत तीन लाख ७५ हजार रुपये किमतीचे दोन ट्रॅक्टर जप्त करून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले.

# पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकासासाठी युवकांचा सहभाग अनिवार्य-प्रा.डॉ.विजयकुमार बांदल

## तुलसी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरात पाणलोट व्यवस्थापनावर डॉ.विजयकुमार बांदल यांचे मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

युवकांनी शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमिनीच्या विकासासाठी सक्रिय सहभाग नोंदवणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले.

तुलसी महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात शनिवार, दि. ३१ रोजी मौजे शिवणी येथे 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या थीमखाली आयोजित सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या बौद्धिक सत्रात ते बोलत होते.



यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर वाघमारे, प्रा. सुरेश वाघमारे, प्रा. श्वेता वंजारे, प्रा.ऋषाली लोखंडे, प्रा. मगन ओव्हाळ तसेच अभय इंगोले उपस्थित होते.पुढे बोलताना डॉ.बांदल म्हणाले की, पाणलोट व्यवस्थापनामुळे जलस्रोतांची वाढ होऊन शेतीला मोठा फायदा होतो. पडीक जमिनीचा योग्य विकास केल्यास उत्पादनक्षमता वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीव ठेवून प्रत्यक्ष कृतीतून समाजासाठी योगदान द्यावे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले, तर आभार प्रा. सुरेश कसबे यांनी मानले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, शिवणी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूकनायकच्या वर्धापन दिनी केज येथे पत्रकारितेच्या विद्रोही परंपरेचा जागर

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.३१ जानेवारी १९२०रोजी सुरू केलेल्या ऐतिहासिक 'मूकनायक' वृत्तपत्राच्या वर्धापन दिना निमित्त शासकीय विश्रामगृह,केज येथे सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.व मुकनायक दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.मूक व वंचित समाजाला नायक आवाज देणाऱ्या या वृत्तपत्राच्या वैचारिक परंपरेचा जागर करत पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी अधोरेखित करण्यात आली.या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते श्री.बाबुराव गालफाडे सर यांच्या हस्ते पत्रकार बांधवांना भारतीय संविधानाच्या प्रती प्रदान करण्यात आल्या.संविधानातील समता,स्वातंत्र्य,बंधुता व न्याय ही मूल्ये पत्रकारिते ची मूलभूत शक्ती असून, सत्य आणि अन्याया विरुद्ध उभे राहणे हेच पत्रकाराचे खरे कर्तव्य असल्याचे याप्रसंगी व्यक्त करण्यात आले.या कार्यक्रमास आझाद



क्रांती सेनेचे तालुका उपप्रमुख श्री.अनिल लोखंडे,सामाजिक कार्यकर्ते ईरफान पठाण यांच्यासह तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी मूकनायकने अस्पृश्य व वंचित समाजाच्या वेदना,विद्रोह व हक्कांना वाचा फोडत दलितपत्रकारितेचा पाया घातल्याचे नमूद केले. मूकनायक हे केवळ वृत्तपत्र नसून,अन्यायी समाज रचनेविरुद्ध लढणारे वैचारिक अस्त्र होते.शिक्षण,हक्क व आत्मसन्मानाची जाणीव निर्माण करत मूक समाजाला नायक बनवण्याचे ऐतिहासिक कार्य या पाक्षिकाने केले. त्यामुळेच दि.३१जानेवारी हा दिवस दलित पत्रकारितेचा आणि सामाजिक न्यायाच्या संघर्षाचा प्रतीक म्हणून साजरा केला जातो. एकूणच,केज येथे साजरा झालेला मूकनायकचा वर्धापन दिन हा पत्रकारितेने संविधानाच्या मूल्यांशी निष्ठा ठेवून समाजातील शेवटच्या घटकाचा आवाज बनावे, हा एकसूत्री संदेश देणारा ठरला.या कार्यक्रमात पत्रकार गौतम बचुटे व महादेव गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौतम बचुटे यांनी केले तर विजय आरकडे यांनी आभार प्रदर्शन केले.

# कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने श्री स्वामी समर्थ वृद्ध आश्रम येथे अन्नदान करून मूकनायक दिन साजरा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

यश तांबवेश्वर सेवाभावी संस्था,केज संचलित स्वामी समर्थ वृद्धाश्रम बोबडेवाडी,ता.केज येथे मूकनायक दिनानिमित्त अत्यंत भावनिक, सामाजिक बांधिलकी जपणारा व प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.वृद्धांच्या जीवनात आनंद,आपुलकी व सन्मानाची भावना निर्माण करणारा हा उपक्रम तालुक्यात चर्चेचा विषय ठरला.या कार्यक्रमास वृद्धाश्रमाचे संस्थापक श्री.महादेव सोपानराव कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार,कलाकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मूकनायक दिनानिमित्त केज येथील कला क्रीडा विश्व समिती च्या कलाकारांनी गीत-संगीताचा सुंदर कार्यक्रम सादर केला.या कार्यक्रमाच्या माध्यमातून वृद्धांना गाण्यांची मैफील बहाल करण्यात आली. वृद्धांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान व आनंद पाहून उपस्थितांचे मन भरून आले.या कला क्रीडा विश्व समितीच्या सर्व कलावंतांच्या पुढाकारातून वृद्धाश्रमा साठी अन्नदान करण्यात आले,ज्यामुळे कार्यक्रमाला सामाजिक सेवेची खरी उंची लाभली.

यावेळी अनिल वैरागे, मुनीर कुरेशी,बलभीम मस्के,ज्ञानेश्वर नागरगोजे, महेश जाधव,श्रीनिवास नवगिरे,अमोल सरवदे, धनराज भालेराव,सागर वाघमारे,ड.अनिता मुंडे, सुनिता बोधने,दिक्षा कांबळे,विमल अंकुशे, सुनिता नागरगोजे,छबु अंधारे,सिंधु मुळे यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.मूकनायक दिनानिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच नुकतेच विमान अपघाता मध्ये निधन झालेल्या स्व. अजित दादा पवार व वैमानिक,सुरक्षा रक्षक, हवाई सुंदरी यांना उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमात सर्व पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला.यामध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील,उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड,पांडुरंग कसबे, पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीत घाडगे,तालुकाध्यक्ष दिनकर जाधव,जयपाल रोकडे,चंद्रपाल मस्के यांच्यासह विविध माध्यमांचे पत्रकार उपस्थित होते.याच वेळी वृद्धाश्रमाचे संस्थापक महादेव (बापु) सोपानराव कराड यांचा सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.आलेल्या सर्व मान्यवरांसाठी तसेच वृद्धांसाठी कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.या स्तुत्य उपक्रमामुळे स्वामी समर्थ वृद्धाश्रमाच्या कार्याला तालुक्यातून मोठी दाद मिळाली असून,समाजातील वंचित दुर्लक्षित घटकांसाठी असे उपक्रम सातत्याने राबवावेत,अशी भावना उपस्थितांनी व्यक्त करण्यात आली.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077